जा.क्र.पोउपआ/वाहतूक विभाग/ठाणे / ५१ /२०१४
पोलीस उप आयुक्त,वाहतूक विभाग, यांचे कार्यालय
ठाणे शहर, दिनांक :– ०१ /१०/२०१४

**'' वाहतुक नियत्रंण अधिसुचना ''**

ठाणे पश्चिम स्टेशन परिसरातील वाहतूक व्यवस्था सुरळीत चालणेसाठी मा.पोलीस आयुक्त,ठाणे यांचेकडील जा.क्र.ठाआ/पशा/वाहतुक/३८१/३/२०१० दिनांक २३/१/२०१० अन्वये या परिसरातील वाहतुक मार्गात बदल करण्याची अधिसुचना जारी करण्यात आली होती. या अधिसुचनेतील अ.नं. ५ कडे वाहतुक मार्गातील बदल व पर्यायी मार्ग पुढील प्रमाणे निश्चित करणेत आला होता.

**गावदेवी कॉर्नर ते डॉ.आंबेडकर चौक (अलोक हॉटेल) कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना गावेदवी कॉर्नर येथून प्रवेश बंद करण्यात येत आहे.**

**पर्यायी मार्ग**:– सर्व वाहने ही गावदेवी कॉर्नर येथून डावी कडे वळून गावदेवी बस स्टॉप,पंजाब नॅशनल बॅक– डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक मार्गे **उजवीकडे अथवा डावीकडे वळून इच्छित** स्थळी जातील. (रिक्षांना डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक येथून उजवीकडे वळण्यास प्रतिबंध राहील.

तत्कालीन वाहतुकीची परिस्थिती व आता वाढलेली वाहनांची मोठया प्रमाणावरील संख्या विचारात घेता या परिसरात वाहतूक कोंडीची गंभीर परिस्थीती निर्माण झालेली असून नागरीकांच्या तक्रारी वाढलेल्या आहेत. यास्तव येथील वाहतूक व्यवस्था सुरळीत ठेवण्याच्या दृष्टीकोनातून व व्यापक जनहित विचारात घेवून, मी डॉ.रश्मी करंदीकर,पोलीस उपायुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर, मला, महाराष्ट्र शासन गृहविभाग एम.व्ही.ए. –११६/सी. आर/३७/टी.आर. दि.०७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५,११६(१)(अ)(ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून अधिसुचना क्र.ठाआ/पशा/वाहतुक/३८१/३/२०१०दिनांक २३/१/२०१० अन्वये निर्गमित करण्यात आलेल्या अधिसुचनेतील अ.नं. ५ कडे निश्चित केलेल्या **पर्यायी मार्गात** खालील प्रमाणे अंशत: बदल करीत आहे.

**अंशत:बदल केलेला पर्यायी मार्ग :–** गावदेवी कॉर्नर येथून डावी कडे वळून गावदेवी बस स्टॉप–पंजाब नॅशनल बॅक– **डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक येथून उजवीकडे –गोखले रोडला जाण्यास सर्व प्रकारच्या वाहनांना प्रतिबंध करण्यात येत असून** ही वाहने डावीकडून पोस्ट ऑफिस–डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा–ठाणे रेल्वे स्टेशन मार्गे डॉ.आंबेडकर चौकातून डाव्या दिशेस वळून गोखले रोड मार्गे इच्छित स्थळी जातील.

सदरची वाहतुक अधिसुचना दिनांक ०२/१०/२०१४ पासुन ३० दिवसांकरीता प्रायोगिक तत्वावर लागु करण्यात येत आहे. याबाबत काही सुचना व आक्षेप प्राप्त न झाल्यास सदर अधिसुचना पुढे कायम अमंलात राहील.

( डॉ.रश्मी करंदीकर )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग,ठाणे शहर

प्रति,

जिल्हा प्रसिध्दी अधिकारी, ठाणे.

२/–सदरची वाहतूक अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

प्रत माहितीसाठी :–

जिल्हाधिकारी, ठाणे.
आयुक्त, महानगरपालीका ठाणे/भिवंडी/बृहन्मुंबई.
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे.
परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका/ नवी मुंबई.
विभाग नियंत्रक, राज्य परिवहन विभाग ठाणे/भिवंडी/नवी मुंबई.

प्रत :– समन्वय अधिकारी ९ ए.एस.पोलीस नोटीस प्रसिध्दीसाठी